दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

नविननिश्चल देवाजी येनोरकर (विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)

लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक) , किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)




छत्रपती संभाजीनगर || वर्ष ६ वे || अंक १२५ || रविवार, ०३ मे २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## २३ हजार रुपयाचे कॉपर वायर बंडल लंपास – एकावर गुन्हा दाखल

सोलापूर – घरात नव्याने फिटींग केलेली वायरींग तोडुन नुकसान केले व २३ हजार रुपये किमतीचे विविध रंगाची कॉपर वायरचे बंडल लंपास केल्याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

प्रभाकर प्रकाश माने ( रा. कल्याण नगर भाग–३, सोलापूर ) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत किरण मल्लिनाथ मिटकरे (रा. ५१ विद्या नगर, शेळगी, सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादीच्या नरसिंग नगर येथील चौथ्या मजल्यावरील प्लॉट नं.७

मध्ये नव्याने वायरिंग फिटिंग सुरू आहे .त्यामुळे या घरात वायरिंग चे नवीन बंडल ही ठेवण्यात आली असताना वरील आरोपीने फिटींग केलेली वायरींग तोडुन नुकसान केले आणि २३ हजार रुपये किमतीचे विविध रंगाची कॉपर वायर बंडल चोरुन नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे . या चोरी व नुकसानीची माहिती फिर्यादीला गुरुवार ३० एप्रिल रोजी सकाळी झाली . पोलीस हवालदार परदेशी गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत .

## हयातनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

हिंगोली प्रतिनिधी

शिवराम कदम

हिंगोलीतील हयातनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला,प्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र दिना निमित्त त्यांचे विचार मांडले,सातेफळ केंद्राचे आदर्श केंद्रप्रमुख श्री साखरे सर यांच्या माध्यमातून



सर्व विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेच्या विकासासाठी घेण्यात आलेल्या शब्द महाप्रभू स्पर्धेचे बक्षीस व प्रमानपत्र वितरित करण्यात आले,त्यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री साहेबराव यशवंते सर,श्री गणेश जाधव (शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष), विठ्ठल पंडित, मारुती सोळंके ,पांडुरंग जाधव ,किशोर थोरवट मगर आर.डी, करनेवार एस.व्ही, होळकर आर.बी, पुरे जी.व्ही, जाधव एन. आर, श्रीमती येनुरवार मॅडम, श्रीमती मिटकरी मॅडम, सय्यद जुबेर व मोहम्मद जाकीर आदी गावकरी व शिक्षक वृंद उपस्थित होते,

## श्री ज्ञानेश्वर विद्यालयाचे एच. एस. सी परीक्षेत घवघवीत यश

आळंदी प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेमध्ये श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी



घवघवीत यश संपादन केले. त्यामध्ये कला शाखेचा निकाल ९२.२० टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ८८.४२ टक्के लागला. वाणिज्य शाखेमध्ये ६०० पैकी ४९९ गुण मिळवत ८३.१७ टक्के मिळवून प्रथम क्रमांक कु.राधा संतोष कदम या विद्यार्थिनींने मिळवला . तसेच कु. रुक्मिणी अभिमान दुनघव व रोहन अजित सोनवणे या विद्यार्थ्यांनी ४८५ गुणांसह ८०.८३% मिळवत संयुक्तरीत्या द्वितीय क्रमांक पटकाविला ,तर कु. अंजली सुधीर महतो या विद्यार्थिनीने ४६८ गुण मिळवून ७८% मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. तसेच कला शाखेमध्ये ६०० पैकी ४८८ गुण मिळवत ८१.३३% मिळवून साहिल मारुती रौंदळ या विद्यार्थ्यांने प्रथम क्रमांक , देवांश सुनील भोकरे याने ४७६ गुणांसह ७९.३३ टक्के मिळवत द्वितीय क्रमांक तर ४६७ गुणांसह ७७.८३ % मिळवत वैभव आसाराम ठोंबरे या विद्यार्थ्याने तृतीय क्रमांक मिळविला .विद्यालयाचा निकाल उत्तम लागल्याबद्दल श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगावकर यांनी सर्व विद्यार्थी व अध्यापकांचे हार्दिक अभिनंदन केले.विद्यालयाचे प्राचार्य किसन राठोड , उपप्राचार्य प्रशांत सोनवणे व पर्यवेक्षिका अनुजयनी राजहंस यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन करून विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

## नसरापूरच्या ग्रामस्थांचे पुणे- सातारा महामार्गावर ठिय्या आंदोलन; बालिकेवर अत्याचार–खून प्रकरणाचे संतप्त पडसाद

पुणे : भोर तालुक्यातील नसरापूर परिसरात चार वर्षीय बालिकेवर अत्याचार करून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी उघडकीस आली. या प्रकरणी राजगड पोलिसांनी एका ६५ वर्षीय आरोपीला ताब्यात घेतले आहे. चार वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिचा खून करण्यात आल्याची घटना उघडकीस आल्यानंतर संतप्त ग्रामस्थांनी पुणे सातारा महामार्गावर शुक्रवारी रात्री आंदोलन केले. त्यानंतर शनिवारी ग्रामस्थांनी मोर्चा काढून बंद पुकारला. ग्रामस्थांनी ठिय्या आंदालन केले. आमदार शंकर मांडेकर यांनी घटनास्थळी भेट दिली.

भोर तालुक्यातील नसरापूर परिसरात साडेतीन वर्षांच्या बालिकेवर एका गोठ्यात अत्याचार केले. त्यानंतर आरोपीने बालिकेला दगडाने ठेचून मारले. आरोपीने तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली पूरल्याचे उघडकीस आल्यानंतर संतप्त पडसाद उमटले. या भागातील नागरिकांनी पुणे–सातारा महामार्गावर ठिय्या आंदोलन सुरू केले. त्यानंतर ग्रामस्थांनी राजगड पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी तातडीने तपास करून आरोपीला ताब्यात घेतले. दरम्यान, आरोपीला



ताब्यात देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली. या घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल आणि अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. 'ग्रामस्थांची बाजू ऐकून आरोपीवर कडक कारवाई करण्यात येईल', असे आश्वासन पोलीस अधीक्षक गिल यांनी दिले.वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जमावाला शांत करण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर नसरापूर परिसरातील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. पुणे ग्रामीण पोलिसांकडून अतिरिक्त बंदोबस्त या भागात तैनात करण्यात आला असून, शनिवारी सकाळी नसरापूर भागतील सर्व व्यवहार ग्रामस्थांनी बंद ठेवले. आरोपीविरुद्ध कठोर कारवाईची मागणी त्यांनी केली. आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांनी आरोपीविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली.पुणे जिल्ह्यातील घटना अत्यंत निंदनीय आणि धक्कादायक घटना आहे. आरोपीला अटक झाली आहे. आरोपीचे अशाप्रकारचे जुने संदर्भही दिसत आहेत. या घटनेतून समाजातून मोठा रोष आहे. सर्वांना या घटनेमुळे पीडित मुलीच्या परिवाराबद्दल प्रचंड हळहळ वाटत आहे. आरोपीला अटक केली आहे, मी आश्वस्त करू इच्छितो की फास्ट ट्रॅक कोर्टात प्रकरण नेऊ. स्पेशल फास्ट ट्रॅक कोर्ट तयार करायला आम्ही उच्च न्यायालयाला विनंती करू. विशेष सरकारी वकील देऊन आरोपीला मृत्यूदंडाची मागणी करणार आहोत. – देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

## लाचखोर महिला अधिकारी अटकेत; पुणे पोलिस दलात खळबळ

पुणे : शहर पोलिस दलात अत्यंत खळबळजनक घटना समोर आली आहे. पुणे पोलिस आयुक्तालयात एका महिला पोलिस अधिका–याला २८ लाख रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे. वैशाली तोटेवार असे या महिला सहाय्यक पोलिस निरीक्षकाचे नाव असून, त्या पुणे आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत होत्या.

थेट पोलिस आयुक्तालयाच्या परिसरात ही कारवाई झाल्याने पोलिस दलात एकच खळबळ उडाली आहे. वैशाली तोटेवार यांची नुकतीच लोहमार्ग (रेल्वे) पोलिस मुंबई येथे बदली झाली होती.

इतकेच नव्हे तर त्यांना पुणे शहर पोलिस दलातून कार्यमुक्त देखील करण्यात आले होते. मात्र, बदली होऊनही आणि पदभार सोडलेला असतानाही त्यांनी २८ लाखांची मोठी रक्कम स्वीकारण्याचे धाडस केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

आर्थिक गुन्हे शाखेच्या एका प्रकरणाच्या तपासा दरम्यान एकूण ३० लाख रुपयांची मागणी झाली होती. त्यापैकी २ लाख रुपये आधी स्वीकारण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा २८ लाख रुपयांची मागणी करण्यात आली. एका खाजगी व्यक्तीच्या माध्यमातून वैशाली तोटेवार या लाचेची रक्कम स्वीकारत होत्या. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून तोटेवार आणि त्या खाजगी व्यक्तीला २८ लाखांची लाच स्वीकारताना ताब्यात घेतले. या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

## विदर्भात साकारणार देशातील पहिले आदिवासी विद्यापीठ

मुंबई : गेल्या तीन दशकांपासून आदिवासी आणि दुर्गम भागात शिक्षणाची गंगा पोहोचवणाऱ्या कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेने आता आपल्या कार्याचा विस्तार संपूर्ण महाराष्ट्रभर करण्याचा मोठा संकल्प केला आहे. संस्थेचे अध्यक्ष अतुल शिरोडकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली विदर्भात देशातील पहिले आदिवासी विद्यापीठ उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या ५०० कोटी रुपयांच्या भव्य प्रकल्पासाठी राज्य शासनाकडे २०० एकर जमिनीची मागणी करण्यात आली असून, त्यातील १५० कोटी रुपये व्हिसा आणि मास्टरकार्ड सारख्या जागतिक कंपन्यांच्या निधीतून, तर उर्वरित ३५० कोटी रुपये लिस्टिंगच्या माध्यमातून उभे केले जाणार आहेत. कामात पारदर्शकता आणण्यासाठी बॉम्बे स्टॉक एक्सचेंजवर ट्रस्टची नोंदणी करण्यात आली आहे. सोबतच, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून राज्यातील ९३ तालुक्यांमध्ये एकल हब उभारले जातील, ज्याद्वारे सॅटेलाइट आणि दृक–श्राव्य माध्यमांतून अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांपर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण



First Tribal University : विदर्भात साकारणार देशातील पहिले आदिवासी विद्यापीठ

पोहोचवले जाईल. नागपूर येथील पहिल्या एकल हबच्या उद्घाटनानंतर आता हे जाळे संपूर्ण महाराष्ट्रात विस्तारले जाणार आहे.

दुसरीकडे, संस्थेने मुंबई महानगरपालिकेसोबतही शैक्षणिक भागीदारी केली असून पालिकेच्या शाळांमधील शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. या सामाजिक चळवळीला बळकट करण्यासाठी संस्थेने एक रुपया दानाचे अभिनव आवाहन केले असून, क्यूआर कोडद्वारे संकलित होणारा हा निधी आदिवासी भागातील बांबू लागवडीच्या प्रकल्पासाठी वापरला जाणार आहे. नितीन गडकरी यांच्या संकल्पनेनुसार, हा बांबू कोळशाला पर्याय म्हणून जैविक इंधन निर्मितीसाठी उपयुक्त ठरेल, ज्यामुळे प्रदूषणावरही नियंत्रण मिळेल. येणाऱ्या काळात आपल्या एकल विद्यालयांची संख्या १,३२२ वरून ५,००० पर्यंत नेण्याचे आणि सुमारे १ लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे मोठे ध्येय संस्थेने ठेवले आहे. मुंबई पोलीस, महानगरपालिका आणि शिक्षण समितीच्या अध्यक्षा राजश्री शिरवाडकर यांच्या सहकार्याने सुरू असलेले हे कार्य आता सोशल मीडियाच्या माध्यमातूनही जनमानसात पोहोचवले जात असून, आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ही संस्था आता नव्या जोमाने सज्ज झाली आहे.

# शेतकऱ्यांच्या मृत जनावरांना मिळणार आर्थिक मदत; जिल्हा परिषदेमध्ये महत्वपूर्ण मागणी!

सहसंपादक
नारायण म्हात्रे

रायगड जिल्हा परिषद पशुसंवर्धन व दुग्धशाळा विषय समितीच्या झालेल्या बैठकीत शेतकरी व पशुपालकांच्या मृत जनावरांना आर्थिक मदत विस हजार देण्यात यावी अशी सर्वस्वी मागणी जिल्हा परिषदेच्या सदस्या पल्लवी भोईर यांनी सभागृहात मांडली हि मागणी योग्य असल्याचे व शेतकऱ्यांच्या हितासाठी आहे असे उपस्थित सर्व सदस्यांनी या मागणीवर जोर धरला हा विषय मंजूरही झाला व अखंड राज्याच्या इतिहासातील ही पहिली जिल्हा परिषद आहे की, मृत जनावरे मग तो कोणताही रोग असो त्यांनी जर पशू दगावला तर त्या शेतकऱ्याला ही मदत त्वरित मिळाली पाहिजे हा निर्णय घेऊन सर्वस्वी मंजूरही केला. या निर्णयामुळे जिल्ह्यातील हजारो पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. जिथे जनावरांच्या सर्व प्रकारच्या मृत्युला आर्थिक संरक्षण दिले जाणार आहे. जिल्हा परिषदेच्या समिती सभागृहात सदरचा विषय पल्लवीताई यांनी जोरदारपणे मांडून प्रत्यक्ष शेतकरी पशुपालकांना भेडसावणाऱ्या अडचणींची दखल घेत प्रशासनाला जबाबदारीची जाणीव करून दिली. पल्लवीताई यांच्या या आक्रमक मागणीमुळे समितीने जनावरांच्या मृत्यू झालेल्या शेतकरी व पशुपालकांना प्रत्येकी विस हजार रुपये पर्यंत आर्थिक मदत देण्याचा ठराव एकमताने पास करण्यात आला. हा निर्णय म्हणजे केवळ ठराव नसून शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची ठोस भूमिका आहे अशी भावना पल्लवीताई यांनी लावून धरल्यामुळे सर्वच सदस्यांनी या ठरावाची एकमुखी मागणी केली. या योजनेसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाला अतिरिक्त निधीची मागणी जिल्हापरिषदेकडे करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला. हा ठराव महासभेच्या अंतिम मंजुरीसाठी सादर करण्यात येणार आहे.



# दापोली तालुक्याचा बारावीचा निकाल ९१.८२ टक्के ०३ महाविद्यालयांचा निकाल १०० टक्के

दापोली प्रतिनिधी: महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता बारावीचा निकाल नुकताच जाहिर झाला आहे. यंदा बारावीचा निकाल९१.८२ टक्के लागला आहे. यंदाही निकालात कोकण विभागाने बाजी मारली आहे.९४.१४ टक्के निकाला सह कोकण विभाग अव्वल ठरला आहे.

दापोली तालुक्यातून१४९१ विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी नोंदणी केली होती, त्यापैकी १४८१ विद्यार्थी परीक्षेला बसले. यामध्ये १३६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तालुक्याचा निकाल ९१.८२ टक्के लागल आहे. तालुक्यातील एकूण१४ महाविद्याल यांपैकी एस. मेहता कॉमर्स ज्युनियर कॉलेज, दापोली, न्यूइंग्लिशस्कूल आणि ज्युनियर कॉलेज टाळसुरे आणि शासकीय तंत्रनिकेतन या ०३ महाविद्या लयांचा निकाल१०० टक्के लागलाआहे.

दापोली तालुक्या मध्ये७७ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य २४१ प्रथम श्रेणी,६६६ द्वितीय श्रेणी ३७६ तृतीयश्रेणी प्राप्त केली आहे.

तालुक्यातील महाविद्यालयांचा निकाल पुढी लप्रमाणे एन.के. वराडकरआणिआर.व्ही. बेलोसेमहाविद्यालयातून२४० विद्यार्थ्यांपैकी विद्यार्थी उत्तीर्णहोऊन८२.०८ टक्के निकाललागलाआहे.,ए.जी. हायस्कूल,

दापोली४७७ पैकी ४६५विद्यार्थीउत्तीर्णहोऊन ९७.४८टक्केनिकाल,डि.पी. दांडेकरकॉलेजकेळशी४२ विद्यार्थ्यांपैकीविद्यार्थी उत्तीर्णहोऊन९७.४७टक्के निकाल,

व्हि.आर.घोले ज्युनियरकॉलेज,वाकवली५ विद्यार्थ्यांपैकीविद्यार्थी उत्तीर्णहोऊन७५.९२ टक्के निकाल, एस.एम.बुटाला ज्युनियर कॉलेज गावतळे २४विद्यार्थ्यांपैकी विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ८३.३३ टक्के निकाल,वेळवीपंचक्रोशी हायकूल वेळवी२५ विद्यार्थ्यांपैकी २२ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ८८.००टक्के निकाल,नॅशनलहायस्कूल दापोली२२० विद्यार्थ्यांपैकी २१२ विद्यार्थीउत्तीर्णहोऊन ९६.३६ टक्केनिकाल, रामराजे कॉलेज

,दापोली१७ विद्यार्थ्यांपैकी १५६विद्यार्थी उत्तीर्णहोऊन ८७.१५टक्के निकाल, एस.मेहताकॉमर्स ज्युनियरकॉलेज,दापोली७१ विद्यार्थ्यांपैकीविद्यार्थी उत्तीर्णहोऊन१०० टक्के निकाल, ज्युनियरकॉलेज आर्टस कॉमर्स हण१६ विद्यार्थ्यांपैकी १४ विद्यार्थी उत्तीर्णहोऊन८७.५० टक्के निकाल, सानेगुरुजी आर्टस, कॉमर्स, सायन्सकॉलेज, पालगड विद्यार्थ्यांपैकीविद्यार्थीउत्तीर्णहोऊन९३.७५ टक्केनिकाल, लोकमान्यटिळ विद्यामंदिरआणिज्युनियर कॉलज,चिखलगांव३८ विद्यार्थ्यांपैकी ३० विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ७८.९४ टक्के निकाल, न्यूइंग्लिशस्कूल आणि ज्युनियरकॉलेज टाळसुरे ७७विद्यार्थ्यांपैकी विद्यार्थी उत्तीर्णहोऊन१००टक्के निकाल ,आय.टि.आय.कॉले दापोली०२ विद्यार्थ्यांपैकी विद्यार्थीउत्तीर्णहोऊन१०० टक्केनिकाललागलाआहे.

# न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज टाळसुरे विद्यालयाचा तीनही शाखेचा १२ वी निकाल १०० %

दापोली प्रतिनिधी:-

सह्याद्री शिक्षण संस्था सावर्डे संचलित न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज टाळसरे विद्यालयाच्या कला वाणिज्य विज्ञान या तीनही शाखेचा बारावी परीक्षा निकाल शंभर टक्के लागला असून परीक्षेला प्रविष्ट झालेले सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने विद्यालयाच्या १००% निकालाची परंपरा अखंड राहिली आहे.

विद्यालयातून प्रविष्ट झालेल्या शाखा निहाय गुणानुक्रमे उत्तीर्ण विद्यार्थी पुढील प्रमाणे

वाणिज्य
१) अदिती सुनिल बैकर – ७८.६७
२) तन्वी संदिप लाले – ७८.३३
३) आर्यन अनिल भुवड – ७७.६७

कला
१) निखिल नरेश कुळे – ७५.५०
२) सायली संतोष करंबेळे – ७४.७३
३) सोहम राजेश जाधव – ६३.३३



विज्ञान
१) प्रियेश प्रदिप शिंदे – ८१.५०
२) आर्यन अनिल देवघरकर – ७२.३३
३) जान्हवी सुधीर साळवी – ७१.१७

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सह्याद्री शिक्षण संस्था सावर्डेचे अध्यक्ष आमदार शेखर निकम कार्याध्यक्ष अनिरुद्ध निकम सचिव महेश महाडिक संचालक शांताराम खानविलकर शालेय समितीचे अध्यक्ष जयवंत जालगावकर सदस्य अशोक जाधव पुरुषोत्तम खोत सरपंच पूर्वा सकपाळ मुख्याध्यापक संदेश राऊत आदींनी कौतुक केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे दीपनंदा बोधे, शारदा अलगुडे, ओंकार मोरे ,जीवन गुहागरकर ,राशी शिगवण, पूजा देवरुखकर, जुईली पवार, सुप्रिया पवार ,सुशांत शिगवण, समीर भोसले अनुराग पाणीग्रही मनोज सुतार आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# लोकरंग

राज्यात ३०० कोटी वृक्ष लागवडीचे लक्ष

वाढते शहरीकरण,प्रचंड प्रमाणात होत असलेले प्रदूषण,वेगवगेळ्या माध्यमातून कार्बन सारख्या घातक वायूचे पर्यावरणात मोठ्या प्रमाणात होत असलेले उत्सर्जन आणि त्यामुळे वर्षानुवर्ष गंभीर बनत चाललेली जागतिक



तापमान वाढीची समस्या लक्षात घेऊनच या पर्यावरण विषयक गंभीर अशा समस्येवर तातडीने उपाययोजना राबविण्यासाठीच आणि बव्हंशी क्षेत्र हे वनाच्छादित करण्याच्या दृष्टीने आज राज्य मंत्रिमंडळाने संपूर्ण राज्यात सुमारे ३०० कोटी वृक्ष लावण्याचे लक्ष जाहीर केले आहे. त्याची कार्यवाही लवकरच सुरु होणार आहे. याच अनुषंगाने राज्याचे वने आणि पर्यावरण मंत्री गणेश नाईक यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

१ राज्य मंत्रिमंडळाने आज ३०० कोटी वृक्ष लागवडीचा निर्णय घेतला त्याबद्दल?

राज्यात ३०० कोटी वृक्ष लागवडीचे लक्ष्य गाठण्यासाठी हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापना करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. सरकारने राज्यात २०४७ पर्यंत ३०० कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आयोगावर सोपविण्यात आली आहे. आयोगाच्या नियामक मंडव्यच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री असतील, तरं उपमुख्यमंत्री उपाध्यक्ष, वनमंत्री, पर्यावरण व हवामान बदल मंत्री, कृषीमंत्री आणि




रोजगार हमी योजना मंत्री सहउपाध्यक्ष असतील.राष्ट्रीय वनधोरणानुसार देशाच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ३३ टक्के क्षेत्र वनाच्छादित किंवा वृक्षाच्छादित असणे अपेक्षित आहे. राज्यात वनाच्छादित आणि वृक्षाच्छादित क्षेत्र अनुक्रमे १६.५३ व ४.७२ टक्के आहे. त्यामुळे एकूण क्षेत्र २१.२५ टक्के होत असून ते ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्यासाठी राज्याने दीर्घ नियोजन केले आहे. राज्याला हे उद्दिष्ट २०४७ पर्यंत साध्य करायचे आहे.

२ या वृक्ष मोहिमेसाठी आयोगाची स्थापना देखील करण्यात आलेली आहे?

हॉ त्यासाठी ३०० कोटी वृक्षारोपण मोहिमेचे नियोजन, अंमलबजावणी, सनियंत्रण आणि वित्तपुरवठ्यासाठी हरित महाराष्ट्र जिल्हानिहाय लैंड बैंक विकसित केल्या जाणार आहेत.

त्यामध्ये वन विभाग, मनरेगा व अन्य विभागांशी समन्वय साधून जमीन उपलब्ध करून घेतली जाणार आहे. यामुळे सध्या विविध विभागांमार्फत सुरू असलेले वृक्षारोपण कार्यक्रम आणि अभियानाची एकात्मिक पद्धतीने अंमलबजावणी करणे शक्य होणार आहे.आयोगाची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली आहे. वृक्ष लागवडीसाठी जागेची उपलब्धता आणि लैंड बैंक निर्मितीवर भर दिला जाईल. सध्या २९ हजार चौरस किलोमीटर जमीन उपलब्ध आहे. ३०० कोटी वृक्ष लागवडीसाठी सुमारे २७ लाख हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे.

३ या वृक्ष लागवड मोहिमेची अनेक उद्दिष्ट आहेत त्याबद्दल?

राज्यातील वनाच्छादित, वृक्षाच्छादित तसेच गवताळ प्रदेशांचा गुणात्मक व परिणामात्मक विस्तार साध्य करणे, हवामान बदलास प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करणे, जलसंधारण सुधारणे, जमिनीचा पीत सुधारणे, जैवविविधतेचे संरक्षण करणे, स्थानिक स्तरावर रोजगार निर्मितीस चालना देणे तसेच स्थानिक नैसर्गिक परिसंस्थांचे जतन क्षेत्रनिहाय पर्यावरणपूरक दृष्टिकोनातून वृक्षलागवड करणे यावर आयोगाच्या माध्यमातून भर दिला जाणार आहे.

२ नोंद

महिलांच्या सशक्तीकरणाचा सर्वात मोठा उपक्रम –महालक्ष्मी सरस

महालक्ष्मी सरस महाराष्ट्रात महिलांच्या सशक्तीकरणाचे एक प्रभावी प्रतीक म्हणून उदयास येत आहे. राज्यात ५० लाखांहून अधिक 'लखपती दीदी' सक्रिय आहेत, ज्यामुळे हा देशातील सर्वात मोठ्या कार्यरत महिला समूहांपैकी एक ठरतो. या महिला केवळ उद्योजिका नसून प्रत्यक्ष अर्थाने रोजगार निर्माण करणाऱ्या आहेत आणि त्या आपल्या कुटुंब व समाजाच्या आर्थिक प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत.उमेद अभियानांतर्गत महालक्ष्मी सरस आता एका व्यापक जनआंदोलनाचे रूप धारण करत आहे, जिथे महिलांना रोजगारासोबतच आत्मनिर्भरता, नेतृत्व आणि सामाजिक ओळख मिळत आहे. हा पुढाकार ग्रामीण महिलांना संघटित करून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे.उमेद अभियानाच्या यशाचा अंदाज यावरून येतो की आतापर्यंत महिलांना ५०,००० कोटी रुपयांहून अधिक कर्ज वितरित करण्यात आले आहे. केवळ मागील वर्षातच १०,००० कोटी रुपयांचे कर्ज संभाव्य महिला उद्योजिकांना देण्यात आले. राज्यात ५० लाखापेक्षा जास्त लखपती दीदी निर्माण झालेल्या आहेत.

मुंबईत २ मे २०२६ पासून महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागांतर्गत उमेदमहाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या वतीने आयोजित ''महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शनी २०२६'' याचे भव्य उद्घाटन बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथे होणार आहे. हे प्रदर्शन १४ मे २०२६ पर्यंत सर्वसामान्य नागरिकांसाठी खुली राहणार आहे.यावर्षी प्रदर्शनात एकूण ५०० स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील २३०, इतर राज्यांतील ६६, नाविन्यपूर्ण उपक्रम करणाऱ्या महिला गटांचे ६८ तसेच महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांचे ३४ स्टॉल्स समाविष्ट आहेत.

३ चला पर्यटनाला

यवतमाळचे ऑक्सीजन पार्क

यवतमाळ जिल्हा हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा व विदर्भातील सर्वात मोठा जिल्हा आहे. पूर्वी या जिल्ह्याला 'यवती' म्हणून ओळखले जात होते. ब्रिटिश काळात हा जिल्हा वनी जिल्ह्याचे प्रमुख विभाग होता. १९०५ मध्ये वनी चे नाव बदलून यवतमाळ असे ठेवण्यात आले.यवतमाळ जिल्हा हा अमरावती प्रशासकीय विभागात येत असून या जिल्ह्यात १६ तालुके आहेत. ऑक्सीजन पार्क-यवतमाळ जिल्ह्यातील निसर्गाच्या सानिध्यात असलेले सुंदर पर्यटन स्थळ आहे. या ठिकाणी लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वजण व्यायाम योग धारणा करू शकतात. आपल्या आयुष्यात वन मोठे की धन मोठे, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. जगातील संपूर्ण संपत्ती गोळा केली तरी सहा महिन्यांचा ऑक्सीजन आपण विकत घेऊ शकत नाही. मात्र झाडे आपल्याला आयुष्यभर मोफत ऑक्सीजन देतात. त्यामुळे जगण्यासाठी धनापेक्षा वनसंपत्ती महत्वाची आहे या दृष्टिकोनातून वनविभागाने या ऑक्सिजन पार्कची निर्मिती केली आहे.



संकलन संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क –९८३३१४६३५६
इमेल –
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
सूर्योदय
रविवार, ०३ मे २०२६



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

# दापोलीत संस्कार भारतीच्या वतीने हौशी चित्रकारांच्या कलाकृतींचे प्रदर्शनाचे उद्घाटन

दापोली प्रतिनिधी: हौशी चित्रकारांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी संस्कार भारती दापोली समितीच्या वतीने चित्रकला प्रदर्शन व विक्री उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. ङ्गङ्गङ्गचित्रकला प्रदर्शन २०२६ङ्गहौशी चित्रकरांचे चित्रकला प्रदर्शन विक्री शुक्रवारी दि. १ मे २०२६ रोजी अर्बन बॅंकेचे अध्यक्ष जयवंत जालगावकर यांच्या हस्ते उदघाटन झाले. यावेळी मनसेचे जिल्हा पदाधिकारी माजी नगरसेवक सचिन गायकवाड, युवा उद्योजक मिहीर महाजन, जेष्ठ कलाकार विद्याधर ताम्हणकर, सौ. जेगरकर, कविता मालू ,श्री. चिंदे ,श्री. दळवी , श्री.पेठकर, आकांक्षा अस्वले आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हे उद्घाटन करण्यात आले.ङ्गङ्ग हे प्रदर्शन १ मे ते ३ मे २०२६ या कालावधीत सोहनी विद्यामंदिर येथील चैतन्य सभागृहात भरवण्यात येणार असून, यात रंग, रेषा आणि कल्पनांच्या संगमातून साकारलेल्या विविध कलाकृती पाहण्याची संधी कलाप्रेमींना मिळणार आहे.ङ्गङ्गस्थानिक स्तरावरील कलाकारांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनात निवडक चित्रांची मांडणी केली जाणार आहे. प्रदर्शनाची वेळ सकाळी ९:३० ते दुपारी १२:०० आणि सायंकाळी ४:०० ते रात्री ८:३० अशी निश्चित करण्यात आली आहे. ङ्गङ्गया प्रदर्शनात जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहून कलाकारांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन आयोजन समितीने केले आहे. दापोलीतील कला क्षेत्राला चालना देणारा हा उपक्रम कलाप्रेमींसाठी मोठी पर्वणी ठरणार आहे.



# खोपी प्रभागाचे शिक्षण विस्तार अधिकारी सुनील वरेकर यांचा सेवापूर्ती समारंभ संपन्न

खोपी प्रभागाचे विस्तार अधिकारी सुनील वरेकर यांचा सेवापूर्ती सोहळा मिर्ले नंबर एक शाळेमध्ये नुकताच संपन्न झाला


या सेवापूर्ती सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी तिसंगी केंद्राचे केंद्रप्रमुख महेंद्र जाधव होते यावेळी व्यासपीठावर बीट मुख्याध्यापक संजय हिंगावार सेवानिवृत्त शिक्षक अजित भोसले शिरगाव नंबर एक शाळेचे मुख्याध्यापक दत्ताराम चव्हाण बिजघर नं एक शाळेच्या मुख्याध्यापिका भाग्यश्री काणेकर सुनील वरेकर यांच्या सुविद्य पत्नी सौ.स्नेहल वरेकर , सुकन्या ॲडव्होकेट



गायत्री वरेकर आदी उपस्थित होते या कार्यक्रमा वेळी संजय जाधव सर व संदीप फागे सर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या ङ्ग कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश कदम यांनी केले ङ्ग कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माधवी भोसले, विजयकुमार भिसे,शैलेश पराडकर, शशिकांत भुवड संदीप घाणेकर तृप्ती तुकाराम काताळे. अंकिता भोसले, सरला मावळी आदींनी प्रयत्न केले

# पनवेल महानगरपालिकेकडुन महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण व भव्य सांस्क्रुतिक कार्यक्रम सोहळ्याचे भव्य आयोजन

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने १ मे रोजी महाराष्ट्र दिन कामगारनिमित्त ध्वजारोहण तसेच बुध्द पोर्णिमा निमित्त



विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या पार्श्वभुमीवर प्रिय अमुचा महाराष्ट्र या विशेष सांस्क्रुत्रिक कार्यक्रमाचे आयोजनही करण्यांत आले होते.महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त पनवेल महानगरपालिका मुख्यालयात सकाळी ७ वा. ध्वजारोहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.महापौर नितिन पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यांत आले असुन या वेळी उपमहापौर,आयुक्त,विविध समित्यांचे पदाधिकारी,सर्व नगरसेवक व महापालिका अधिकारीसहीत बहुसंख्येने कर्मचारी वर्ग उपस्थित होता.महाराष्ट्राची गौरवशाली पंरपरा आणि महापुरुषांच्या पराक्रमाचा वारसा उलगडणारा हा कार्यक्रम शुक्रवार १ मे रोजी सकाळी ११ वाजता आद्य क्रांतीवीर वासुदेव बळंवत फडके नाट्यग्रुह,पनवेल येथे संपन्न झाला.

# महाराष्ट्र कामगार दिनाची औपचारिकता साधून दापोली तालुक्यातील मौजे माळवी पोलीस पाटील सेवानिवृत्त कार्यक्रम साजरा

दैनिक सूर्योदय केळशी प्रतिनिधी.

दापोली पोलीस स्थानक अंतर्गत असणाऱ्या आडेबिट क्षेत्रातील मालवी गावचे कर्तव्यदक्ष पोलीस पाटील संजय आनंदी हरी मालप यांचे महाराष्ट्र कामगार दिनाचे महत्त्व बाळगून सेवानिवृत्त कार्यक्रम पार पाडण्यात आला. संजय मालप यांनी १५/०१/१९९५ ते ३०/०४/२०२६ अशी ३१ वर्ष सेवापूर्ती करून सेवानिवृत्त झाले. त्यांच्याकडे लोणवडी, मालवी , ईळणेअशा गावांचा चार्ज होता .कोरोना काळात त्यांनी गावात खूप महत्त्वाची भूमिका बजावली .मालवी राम मंदिर सभागृह त्यांच्या सेवानिवृत्तीचे कार्यक्रम





पार पडला. कार्यक्रमासाठी दापोली पोलीस निरीक्षक महेश तोरस्कर, उपनिरीक्षक राजकुमार यादव आणि बीट अंमलदार राजू मोहिते, सहाय्यक अण्णा देवकुळे, क्षेत्रातील सर्व पोलीस पाटील , मालवी गाव व पंचकोशीतील मुंबई मंडळ व ग्रामीण असे सर्व ग्रामस्थ त्यांना शुभेच्छा देण्यासाठी हजर होते माळवी मुंबई व ग्रामीण मंडळाने त्यांना पुढील आयुष्याच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आढावा बैठक मुंबई येथे संपन्न

कर्जत (प्रतिनिधी)

महाराष्ट्र दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आढावा बैठक मुंबई येथे कार्यालयात पार पडली या बैठकीला कर्जत शहरातर्फे शहराध्यक्ष व शहर कमिटी उपस्थित होती यामध्ये प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे व खासदार सुरेश म्हात्रे यांच्याबरोबर कोरोना काळात बंद झालेल्या रेल्वे गाड्या पुन्हा सुरळीत चालू व्हावेत व लांब पल्ल्याच्या गाड्यांना कर्जत रेल्वे स्थानकावर थांबा मिळावा कारण कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशनच्या कार्यक्रमाला जी सह्यांची मोहीम शहरांमध्ये घेतली गेली होती त्यामध्ये पक्षाने सहभाग घेतला होता तरी ह्या मीटिंगमध्ये कर्जत शहराला रेल्वेचा थांबा मिळावा अशी प्रमुख मागणी शहराध्यक्ष एडवोकेट भाऊसाहेब मोरे यांनी महाराष्ट्र रेल्वे बोर्डावर असणारे खासदार सुरेश म्हात्रे यांच्या जवळ केली होती व त्यांनी कर्जत शहरातील शिष्टमंडळ माझ्याकडे घेऊन या आपण



डीआरएम ऑफिसला बरोबर जाऊन त्यांच्याकडून आपल्या मागण्या मान्य करून घेऊ व त्यांच्याकडे जाऊन निवेदन देऊ असे आश्वासन दिले तसेच मी पुढच्या आठवड्यामध्ये आपण निवेदकांना बरोबर घेऊन या मी त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करीन असे सुतोवाच केले तर महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी देखील राष्ट्रवादी काँग्रेसचा पक्षाचा पूर्ण पाठिंबा असल्याचे जाहीर केले ङ्ग कर्जत तालुक्यात टोरंट प्रकल्प पोशीर धरण व शिलार धरण या दोन्ही धरणांना कर्जत शहराध्यक्ष एडवोकेट भाऊसाहेब मोरे यांनी विरोध केला होता प्रत्यक्ष धरण बाधित लोकांना भेटून त्यांच्या मागण्या हे धरण होऊ नये म्हणून आहेत असे पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष व खासदारांना सांगितले व त्यांनी दोघांनी स्वतः या गोष्टीकडे लक्ष देणार आहोत वेळ पडल्यास उपोषण स्थळी त्या दोन्ही धरणात धरण बाधित गावांना भेट देण्याचा आश्वासन दिले त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा आंदोलनाला पूर्ण पाठिंबा असण्याचे जाहीर केले.

# इंदापूर येथील ७० वर्षाच्या आजी.. प्रतिभा गारटकर यांनी सूर्य देवासाठी लिहिलेली कविता .... सूर्य देवा.. सूर्य देवा!...

रायगड जिल्हा उत्तर उपसंपादक
मंगेश यादव: सूर्य देवा सूर्य देवा..
रागावलास का रे असा
लाल लाल डोळे वटारून
बघतोस का रे आज असा?
धग धग आग आग
तगमगते ती धरती तुझी
बघवतेय का तळमळ ती
प्रिया लाडकी रे तुझी!



सुख आनंद प्रकाश तुझा
प्रकार ढगाआड का गेला?
अवतार जमदग्नीचा तू
असा धारण का केला?
कडक उन्हाळा नेहमीचा
नाही रे हा मुळी नाही
जीव घेण्या झळा तुझ्या या
आग काहिली जीवाची ही!
विध्वंस पर्यावरणाचा
देवा, चूक आम्ही केली
वृक्षतोड सिमेंटची ही
जंगले आम्हीच उभी केली!
लावू झाडे जगवू पाहू
प्रसन्न सुखी धरती माता
सुखे जगू दे सर्वांना
देवा,राग आवर आता.
..... प्रतिभा गारटकर

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफिसजवळ, माळीवेस बीड– ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालय: जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )